**भुजबळ नॉलेज सिटी**

**मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी- नाशिक , ४२२००३**

**<u>मराठी भाषा गौरव दिन अहवाल २०१९</u>**

# मराठी राजभाषा गौरव दिन

२७ फेब्रुवारी २०१९ हा दिवस मराठी भाषा गौरव दिवस म्हणून मेट्स भुजबळ नॉलेज सिटी येथील मेट्स इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी कॉलेज, नाशिक मध्ये मोठया उत्सवात साजरा करण्यात आला. विशेषतः एस. वाय. बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने भाग घेतला. सिद्धार्थ साळवे या विद्यार्थ्याने कुसुमाग्रज उर्फ वि.वा शिरवाडकर यांच्या जीवन चरित्रा विषयी माहिती दिली. व तसेच प्रतीक्षा सहाणे या विद्यार्थीनीने कविता वाचन केले. प्रतीक्षा मंडलिक व सृष्टी होडे यांनी पु. ल. देशपांडे यांच्या विविध प्रकारच्या साहित्याबद्दल माहिती दिली. निलम फटांगरे या विद्यार्थीनीने मराठी भाषा कशी समृद्ध होत गेली, आणि मराठी भाषेचा आदर केला पाहिजे या विषयीचे महत्व विशद केले. जेष्ठ कवी व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज उर्फ वि.वा शिरवाडकर यांचे मराठी भाषा व साहित्यातील महत्वाचे योगदानाबद्दल प्रा. सुशील पाटील यांनी मार्गदर्शन केले. ग्रंथपाल नितीन भामरे यांनी विद्यार्थ्यांना इग्रंजी माध्यमाच्या शाळेकडे वाढता कल बघता, आज मराठी माध्यमाच्या शाळेलाही तितकेच महत्व दिले पाहिजे असे सांगितले.

१ ते १५, जानेवारी २०१९ मराठी भाषा पंधरवडा निमित्ताने घेण्यात आलेल्या हस्ताक्षर व निबंध स्पर्धेच्या विजेत्या विद्यार्थ्यांना मराठी पुस्तक भेट देऊन गौरवण्यात आले. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. रोहिणी जाधव, द्वितीय क्रमांक कु. सिद्धार्थ साळवे व तसेच मराठी हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. निलम फटांगरे द्वितीय क्रमांक कु. लीना शिरसाठ यांना देण्यात आले. या कार्यक्रमास एकूण ६२ विदयार्थी उपस्थित होते.

सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. सुशील पाटील आणि ग्रंथपाल नितीन भामरे यांनी केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन मिळाले.



*१. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थ्यांना संबोधित करतांना प्राध्यापक सुशील पाटील.*




*२. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थ्यांना संबोधित करतांना ग्रंथपाल श्री. नितीन भामरे.*




*३. एस. वाय. बी. फार्म. चा विद्यार्थी सिद्धार्थ साळवे, कुसुमाग्रज उर्फ वि.वा शिरवाडकर यांच्या जीवन चरित्रा विषयी माहिती देतांना..*



*४. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. रोहिणी जाधव या विद्यार्थिनीला मिळाल्याबद्दल पुस्तक भेट देतांना प्रा. सुशील पाटील.*




५. निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक सिद्धार्थ साळवे या विद्यार्थ्याला मिळाल्याबद्दल पुस्तक भेट देतांना प्रा. सुशील पाटील.



६. हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. निलम फटांगरे या विद्यार्थिनीला मिळाल्याबद्दल पुस्तक भेट देतांना ग्रंथपाल श्री. नितीन भामरे.



*७. हस्ताक्षर स्पर्धेत द्वितीय क्रमांक कु. लीना शिरसाठ या विद्यार्थिनीला मिळाल्याबद्दल पुस्तक भेट देतांना ग्रंथपाल श्री. नितीन भामरे.*